तातडीचे/महत्वाचे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र.मातंवि/१२/कावि/२२८/२०१८
दि.१७/१०/२०१८

परिपत्रक,

**विषय - 'डॅशबोर्ड' संगणक प्रणालीमध्ये अंदाजपत्रकात नमुद कामाची नोंद घेणबाबत.....**

दिनांक १६/१०/२०१८ रोजी CTO मिटींगमध्ये आयुक्तसो. यांनी दिलेल्या सुचनेनुसार CTO मार्फत विविध प्रकल्पांचे /कामांचे डॅशबोर्ड' संगणक प्रणालीचे Monitoring (आढावा) घेतला जाणार आहे. त्यासाठी सर्व संबंधित विभागांची सन २०१७-१८ व २०१८-१९ चे मंजूर अंदाजपत्रकातील सर्व नमुद भांडवली कामांची तपशीलवार माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'डॅशबोर्ड' संगणक प्रणालीमध्ये नोंद घेणे आवश्यक आहे.

या परिपत्रकान्वये सर्व भांडवली कामकाजासंदर्भातील विभागप्रमुखांना कळविणेत येते की, आपले विभागासंबंधी सन २०१७-१८ व २०१८-१९ चे मंजूर अंदाजपत्रकातील सर्व नमुद कामांची तपशीलवार माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'डॅशबोर्ड' संगणक प्रणालीमध्ये नोंद घेणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने सर्व संबंधित भांडवली कामकाजांसाठी विभागांनी अंदाजपत्रकातील सर्व नमुद कामांची तपशीलवार माहिती दिनांक ०३ नोव्हेंबर २०१८ पर्यंत 'डॅशबोर्ड' संगणक प्रणालीमध्ये अद्यावत करणेकामी अंदाजपत्रकातील सर्व नमुद कामे संबंधित कनिष्ठ अभियंता, उपअभियंता यांना विभागून देऊन डॅशबोर्ड प्रणालीमध्ये नोंदी घेणेकामी सर्व संबंधितांना सुचना देणेत याव्यात.

सदरबाबत काही तांत्रिक अडचण आल्यास माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे संपर्क साधुन उपरोक्त माहिती 'डॅशबोर्ड' संगणक प्रणालीमध्ये वेळेत नोंद घेणेबाबत दक्षता घेणेत यावी. सदरची माहितीची दि.०३ नोव्हेंबर २०१८ पुर्वी नोंद न घेतलेस व वेळोवेळी अद्ययावत न झालेस याबाबत सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभागाकडील कनिष्ठ अभियंता, उपअभियंता यांची राहील याची गांभिर्यपुर्वक नोंद घेणेत यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

प्रत - सर्व संबंधित विभाग